आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
१४ जानेवारी २०२६ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्यातल्या महापालिका निवडणुकांसाठी उद्या होणाऱ्या मतदानाची तयारी पूर्ण

- छोट्या पक्षांना जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीत पक्ष चिन्ह आरक्षित करण्यासाठी उद्यापर्यंत अर्ज करावे लागणार

- नीती आयोगाच्या निर्यात सज्जता निर्देशांकात महाराष्ट्र अव्वलस्थानी

- मुंबईच्या सराफा बाजारात चांदीच्या दरात आज किलोमागं साडे १४ हजार रुपयांची वाढ / कराशिवाय पावणे ३ लाख रुपये दराचा टप्पा ओलांडला.

**आणि**

- एकदिवसीय क्रिकेट मालिकेत आज राजकोटमध्ये सुरू असलेल्या दुसऱ्या सामन्यात भारताचं न्यूझीलंडपुढं विजयासाठी २८५ धावांचं आव्हान

**<><><><><>**

राज्यातल्या २९ महानगरपालिका निवडणुकांसाठी उद्या मतदान होणार आहे. या निवडणुकीसाठी एकूण ८९३ प्रभागांमधल्या २ हजार ८६९ नगरसेवक पदांसाठी १५ हजार ९३१ उमेदवार रिंगणात आहेत. एकूण ३ कोटी ४८ लाखांपेक्षा अधिक मतदार, उद्या त्यांचं राजकीय भवितव्य ठरवतील. त्यांच्यासाठी सुमारे ४४ हजार कंट्रोल युनिट आणि सुमारे ८८ हजार बॅलेट युनिट कार्यरत असतील. सुमारे २ लाख अधिकारी आणि कर्मचारी यासाठी मतदान केंद्रांवर पोहोचले आहेत. या सर्व मतदान केंद्रांवर ज्येष्ठ नागरिक, गर्भवती, दिव्यांगासाठी विशेष सोयीसुविधा उपलब्ध आहेत. विविध ठिकाणी मतदान साहित्याचं वाटप आणि कर्मचाऱ्यांना मतदान केंद्रांवर पोहोचवण्याची तयारी सुरू आहे. या मतदानाच्या निमित्त महापालिका क्षेत्रातल्या सर्व कार्यालयांना सरकारनं सुटी जाहीर केली आहे. विविध

ठिकाणी मतदान करणाऱ्यांना प्रोत्साहन म्हणून विविध सवलती दिल्या जाणार आहेत.

उद्याच्या मतदानाविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**- - - होल्ड व्हाइस कास्ट - - -**

*(राज्यातल्या २९ महापालिकांसाठी उद्या सकाळी साडेसात ते साडेपाच दरम्यान मतदान होणार आहे. यासाठी निवडणूक आयोगानं दिलेलं मतदार ओळखपत्र मतदारांना दाखवता येईल. याशिवाय छायाचित्र असलेली इतर १२ ओळखपत्र दाखवली तरीसुद्धा मतदान करता येईल. या ओळखपत्रांमध्ये पारपत्र, आधार कार्ड, वाहन परवाना, पॅन कार्ड, सरकारी कर्मचाऱ्यांचे ओळखपत्र, निवृत्ती वेतनाची कागदपत्र, लोकप्रतिनिधींची ओळखपत्रं, स्वातंत्र सैनिकांचं ओळखपत्र, बँक आणि टपाल खात्याचे पासबुक, दिव्यांग दाखला, मनरेगाचं जॉब कार्ड, किंवा आरोग्य विमा योजनेचं कार्ड यांचा समावेश आहे.*

*मुंबई वगळता राज्यातल्या इतर सर्व महापालिकांमध्ये बहुसदस्यीय प्रभाग रचना आहे. बहुतांश प्रभाग हे ४ सदस्यीय असून काही प्रभाग ३ किंवा ५ सदस्यीय आहे. त्याठिकाणी मतदानांना जितक्या सदस्यांचा प्रभाग तितकी मतं द्यावी लागणार आहे. त्यांच्या ईव्हीएमवर ४ वेगवेगळ्या रंगाच्या मतपत्रिका असतील. या प्रत्येक मतपत्रिकेवर त्या त्या क्रमांकाच्या सदस्यपदासाठी उभ्या असलेल्या उमेदवारांची यादी आणि नोटाचे बटन असेल. मतदारांना ईव्हीएममध्ये या सर्व मतपत्रिकांच्या समोर असलेलं बटन दाबावं लागेल. मत नोंदवल्यावर ज्या उमेदवाराला मत दिलं त्याच्या समोरचा लाइट लागेल. सर्व उमेदवारांना मत दिल्यावर शेवटी बीप असा आवाज येईल आणि मतदान पूर्ण झालं याची खात्री मतदारांना मिळेल.)*

**<><><><><>**

राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी असलेल्या आणि विशिष्ट अटींची पूर्तता करणाऱ्या नोंदणीकृत, पण मान्यताप्राप्त नसलेल्या राजकीय पक्षांना जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत तात्पुरत्या स्वरुपात निवडणूक चिन्ह आरक्षित करून हवं असेल, तर त्यांनी उद्यापर्यंत अर्ज करणं आवश्यक आहे, असं राज्य निवडणूक आयोगानं स्पष्ट केलं आहे.

खरं तर यासाठी निवडणूक जाहीर झाल्यानंतर लगेच आणि उमेदवारी अर्ज भरायला सुरूवात होण्याच्या ३ दिवस आधी अर्ज करणं अनिवार्य असतं आणि १ दिवस आधी जिल्हाधिकारी त्यावर निर्णय घेतात. पण काल जाहीर झालेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार दोन दिवसांतच, म्हणजे १६ जानेवारीपासून नामनिर्देनपत्र दाखल करायला सुरुवात होणार आहे. त्यामुळे एखाद्या जिल्हा परिषदेच्या गेल्या निवडणुकीत एखाद्या नोंदणीकृत, पण मान्यताप्राप्त नसलेल्या राजकीय पक्षानं संबंधित अटींची पूर्ता केली असेल तर त्यांना उद्यापर्यंत

जिल्हाधिकाऱ्यांकडे अर्ज करावा लागेल. त्यावर संबंधित जिल्हाधिकारी १६ जानेवारीला निर्णय घेतील.

**<><><><><>**

महापालिका निवडणुकांच्या तोंडावर सरकारला हव्या त्या सुविधा देण्यासाठी निवडणूक आयोग रोज कायदे बदलत असून, हरलेली बाजी जिंकण्यासाठी निवडणूक आयोग सरकारला मदत करत आहे, असा आरोप महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केला आहे. ते आज मुंबईत बातमीदारांशी बोलत होते. माजी मुख्यमंत्री उद्धव  ठाकरेही यावेळी उपस्थित होते. प्रिंटिंग ऑक्झिलरी डिस्प्ले युनिट अर्थात 'पाडू' नावाचं यंत्र या निवडणुकीत वापरणार असल्याचं आयोगानं कोणत्याही राजकीय पक्षाला सांगितलेलं नाही, किंवा दाखवलेलं नाही. यावर उद्धव ठाकरे यांनी  निवडणूक आयोगाला पत्र लिहिलं आहे, असंही राज ठाकरे यांनी सांगितलं.

मतदानाच्या आदल्या दिवशी सायंकाळी ५ वाजेपर्यंत उमेदवार, नेते हे मतदारांना त्यांच्या घरी जाऊन भेटू शकतात, असा बदल निवडणूक आयोगानं केला आहे. ही नवीन पद्धत कुठून आली? असा प्रश्न त्यांनी केला. दरम्यान, याबाबत कुठलाही नवीन आदेश जारी केलेला नाही. त्यासंदर्भातला आदेश जुनाच असून तो १४ फेब्रुवारी २०१२ मध्येच जारी केला होता, असं राज्य निवडणूक आयोगानं स्पष्ट केलं आहे.

**<><><><><>**

मतदारांना भेटणं हे पूर्णतः नियमात असल्याचं, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनीही म्हटलं आहे. ते आज नागपुरात बातमीदारांशी बोलत होते.
काँग्रेस आणि ठाकरे यांना पराभव निश्चित दिसत असल्यानं ते आधीच ईव्हीएमला दोष देत आहेत, अशी टीका त्यांनी केली.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुरंदर उपसा सिंचन प्रकल्पावर केलेल्या आरोपांवर बावनकुळे म्हणाले की, १९९९ ते २०२४ हा मोठा कालावधी आहे. एवढ्या वर्षांनंतर आरोप करणे योग्य नाही. जनता अशा आरोपांवर विश्वास ठेवणार नाही. 'लाडकी बहीण' योजनेवर काँग्रेसकडून होत असलेल्या आरोपांवरही त्यांनी जोरदार टीका केली.

**<><><><><>**

राज्यात महापालिका निवडणुका होत आहेत. या अनुषंगानं प्रत्येक सजग आणि सुजाण नागरिकानं येत्या १५ तारखेला आपला मतदानाचा हक्क बजावावा आणि योग्य उमेदवाराला निवडून द्यावं, असं आवाहन अभिनेते, दिग्दर्शक आणि निर्माता सुबोध भावे यांनी केलं आहे.

**होल्ड... बाईट- सुबोध भावे (१७ सेकंद)**

**<><><><><>**

निर्यात सज्जता निर्देशांकात महाराष्ट्र अव्वल असल्याचं नीती आयोगाच्या अहवालात म्हटलं आहे. निर्यात करण्याबाबतची राज्याची क्षमता आणि तयारी दर्शवणारा चौथा निर्यात सज्जता अहवाल निती आयोगानं आज प्रसिद्ध केला. राज्याचं निर्यात धोरण, व्यवसाय सुलभता, पायाभूत सुविधांची उपलब्धता तसंच प्रत्यक्ष निर्यात अशा अनेक बाबींवरुन हा निर्देशांक ठरवला जातो.

या अहवालानुसार महाराष्ट्रानंतर तामिळनाडू, गुजरात, उत्तर प्रदेश, आंध्रप्रदेश, कर्नाटक आणि पंजाब या राज्याचा क्रमांक लागतो.

लहान आकाराच्या राज्यांमध्ये उत्तराखंड निर्यातसज्जतेत पहिल्या क्रमांकावर आहे.

**<><><><><>**

मुंबईच्या सराफा बाजारात चांदीनं आज प्रतिकिलो करांशिवाय पावणे ३ लाख रुपयांचा टप्पा ओलांडला. एका दिवसात चांदी साडे १४ हजार रुपयांनी महाग झाली. त्यामुळं करांसह एक किलो चांदीला सुमारे २ लाख ८६ हजार रुपये मोजावे लागत होते.

सोनं आज तोळ्यामागे सुमारे सतराशे रुपयांनी महाग झालं. त्यामुळे दहा ग्रॅम २४ कॅरेट सोनं १ लाख ४६ हजार रुपयांना, तर २२ कॅरेट सोनं १ लाख ४२ हजार रुपयांना मिळत होते.

देशातल्या शेअर बाजारात आज घसरण झाली. सेन्सेक्स २४५ अंकांनी घसरुन ८३ हजार ३८३ अंकांवर बंद झाला. निफ्टी ६७ अंकांची घट नोंदवून २५ हजार ६६६ अंकांवर थांबला.

**<><><><><>**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातल्या एकदिवसीय क्रिकेट मालिकेत आज राजकोटमध्ये सुरू असलेल्या दुसऱ्या सामन्यात भारतानं न्यूझीलंडपुढं विजयासाठी २८५ धावांचं आव्हान ठेवलं आहे. न्यूझीलंडनं नाणेफेक जिंकून भारताला प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रित केलं. भारतानं के. एल. राहुलच्या नाबाद ११२ धावांच्या बळावर निर्धारित ५० षटकात ७ गडी गमावून २८४ धावा केल्या. कर्णधार शुभमन गिलनं ५६ धावांचं योगदान दिलं.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा न्यूझीलंडच्या १६ षटकात २ बाद ६९ धावा झाल्या होत्या..

**//<><><><><>//**